# दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३०/२०२२ मधील नि. १ वरील आदेश

## राधिका सुतार वगैरे विरुद्ध युवराज वगैरे

[CNR NO. MHSN07000744-2022]

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम ८ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**अर्जदाराच्या अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे :–**

२. अर्जदार क्र. १ चे अजोबा, अर्जदार क्र. २ यांचे पती व अर्जदार क्र. ३ व ४ यांचे वडील कै. गणपती रामचंद्र सुतार हे दि. ०६.०५.२०२० रोजी नागज येथे मयत झाले. तसेच मयत गणपती व अर्जदार क्र. २ यांचा मुलगा किशोर हा दि. ०२.०८.२०२० रोजी मयत झाला असून त्याची पत्नी निर्मला हि दि. ०१.१०.१९९९ रोजी मयत झाल्या आहेत. मयत किशोर व मयत निर्मला यांना अर्जदार क्र. १ याच कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय मयतांस अन्य कोणीही वारस नाहीत. मयत गणपती रामचंद्र सुतार यांचे अर्जदार क्र. १ ही नात, अर्जदार क्र. २ पत्नी, अर्जदार क्र. ३ मुलगी, अर्जदार क्र. ४ मुलगी, जाबदार क्र. १ हा नातू व जाबदार क्र. २ ही सून असे नाते आहे. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत गणपती रामचंद्र सुतार यांचे अर्जदार क्र. १ ते ४ व जाबदार क्र. १ व २ हे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदारांतर्फे युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली.

४. अर्जातील बाबींना व अर्जदारांच्या युक्तीवादास अनुसरुन खालील मुद्दे माझे समोर उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत**

५. अर्जदाराने त्याचे अर्जातील कथनाच्या पृष्ठ्यर्थ अर्जदार क्र. १ राधिका विकास सुतार यांनी पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. २७, नागज येथील खाते उतारा क्र. ३८२८, नागज येथील खाते उतारा क्र. ३८२०, नागज येथील गट नं. ८४१/१, अर्जदार यांचे आधार कार्ड झेरॉक्स, मयत किशोर गणपती सुतार यांचे मृत्यु प्रमाणपत्र, मयत निर्मला किशोर सुतार यांचे मृत्यु प्रमाणपत्र, मयत गणपती रामचंद्र सुतार यांचे मृत्यु प्रमाणपत्र, तसेच वर्तमानपत्रातील जाहीर प्रगटन केल्याची प्रत नि.क्र. २६ व अर्जदार तर्फे पुरावा बंद पुरसीस नि. क्र. ३३ व जाबदार तर्फे साक्षीदार पद्मीनी किशोर सुतार यांचे सरतपासाचे शपथपत्र नि. २८ दाखल करण्यात आले. जाबदार तर्फे पुरावा बंद पुरसीस नि.क्र. ३४ अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. पटलावर दाखल एकंदर पुरावा पाहता तो अर्जातील कथनांशी सुसंगत व समर्थनीय दिसुन येते.

६. प्रस्तुत प्रकरणात आक्षेप मागविण्यासाठी दि. २४.०८.२०२२ रोजी दैनिक तरुण भारत या वर्तमानपत्रामधील जाहीर प्रगटन केल्याची प्रत अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. सदर प्रगटनाच्या अनुषंगाने विहीत मुदतीमध्ये तिऱ्हाईत इसम यांनी आक्षेप दाखल केला की, जाबदार हे मयत गणपती यांचा मयत मुलगा किशोर यांचे अनुक्रमे मुलगा व पत्नी आहेत. जाबदार क्र. १ चा मयत किशोर याच्याशी विवाह अर्जदार क्र. १ ची आई म्हणजेच किशोरची पहिली पत्नी निर्मला यांच्या मृत्युनंतर झालेला असल्याने ते देखील मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांनी जाबदार यांना अर्जामध्ये सामील करुन वारसप्रमाणपत्र देण्यास हरकत नसल्याचे कळवल्याने त्यांना जाबदार क्र. १ व २ म्हणून सामील करण्यात आले.

७. पटलावर दाखल एकंदर पुरावा पाहता तो अर्जातील कथनांशी सुसंगत व समर्थनीय असल्याचे दिसुन येते. अर्जदाराने त्याच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये, मयतांस अर्जदार व जाबदार यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नसल्याचे शपथेवर कथन केले

आहे. जाबदार क्र. १ चा मयत किशोर याच्याशी विवाह अर्जदार क्र. १ ची आई म्हणजेच किशोरची पहिली पत्नी निर्मला यांच्या मृत्यु नंतर झालेला असल्याचे जाबदार क्र. २ हिने शपथेवर कथन केले आहे. अर्जदार क्र. १ च्या जाबदार क्र. १ हे मयत गणपती रामचंद्र सुतार यांचे नातू व जाबदार क्र. २ ही मयताची सुन आहे. अर्जदार यांचा सदर नातेसंबंधाबाबत कोणताही आक्षेप नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ४ व जाबदार क्र. १ व २ हे मयताचे वारस आहे हे सिद्ध होते. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ च्या निष्कर्ष होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार क्र. १ राधिका विकास सुतार, अर्जदार क्र. २ पमाबाई गणपती सुतार, अर्जदार क्र. ३ रेखा योगेश सुतार, अर्जदार क्र. ४ तेजश्री निशीकांत सुतार व जाबदार क्र. १ युवराज किशोर सुतार व जाबदार क्र. २ पद्मिनी किशोर सुतार हे मयत गणपती रामचंद्र सुतार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस–प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| ३. | आवश्यक ते न्यायालयीन शुल्क स्विकारुन अर्जदाराच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे. |

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.07.06 17:15:00 +0530

**दिनांक : ०६.०७.२०२६** **( एम. ए. कुलकर्णी )**

ठिकाण : कवठेमहांकाळ

सह दिवाणी न्यायाधीश क स्तर,
कवठेमहांकाळ.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 06.07.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 06.07.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 06.07.2026 |